सायबर पोलीस ठाणे,
गुन्हे शाखा,
मुंबई.

प्रेस नोट    दि. ०६/०४/२०२०.

---

“बॅंकेच्या नावे संपर्क साधून लोकांची फसवणुक होत असलेबाबत”

<u>“नागरिकांना आवाहन”</u>

---

करोना विषाणुचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी भारतीय रिजर्व्ह बॅंकेने सर्व बॅंकांना त्यांचे ग्राहकास शक्य तितक्या डिजिटल बॅंकिंग सुविधेचा वापर करण्यास प्रोत्साहित करणेबाबत अधिसूचित केले आहे. या पार्श्वभूमीवर सायबर गुन्हेगार इंटरनेट च्या माध्यमातून डिजीटल बॅंकिंग सुविधेचा गैरवापर करून जनतेची फसवणूक करीत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.

सायबर पोलीस ठाणे, मुंबई यांनी सदर तक्रारींचे विश्लेषण केले असता असे निदर्शनास आले आहे की, सायबर गुन्हेगारांनी सायबर गुन्हे करण्याचा नवीन मार्ग शोधला आहे.

१. सद्य स्थितीत विविध बॅंकांनी त्यांचे ग्राहकांना त्यांचे कर्ज खात्याशी संबंधित ईएमआय पुढे ढकलण्यासाठीची सुविधा उपलब्ध करून दिली असून त्यासाठी सायबर गुन्हेगार बॅंक अधिकारी/कर्मचारी बोलत असल्याचे भासवून त्यांचे बॅंक खात्याशी संबंधित गोपनीय माहिती जसे की, पिन, सीव्हीव्ही, ओटीपी इ. माहिती प्राप्त करून घेवून फसवणूक करीत आहेत.

२. तसेच सध्या सायबर गुन्हेगार ग्राहकांना बॅंकांच्या नावे एसएमएस पाठवून त्याद्वारे **AnyDesk, Quick Support, Team Viewer, Airdroid** इ. सारखे वेगवेगळे स्क्रिन शेअरिंग ॲप्स डाउनलोड करण्यास भाग पाडून त्यांचे मोबाईल व संगणकांचा अनधिकृत ताबा घेवून फसवणूक करीत आहेत.



बॅकेचा अधिकृत प्रतिनीधी असल्याचे भासवुन ग्राहकांकडुन त्यांचे बॅक खात्याची गोपनिय माहीती व त्यांचे मोबाइल क्रमांकावर आलेला ओटीपी नंबर देण्यास भाग पाडून किंवा त्यांना एखादे ॲप्लीकेशन डाउनलोड करण्यास सांगुन त्यांव्दारे बॅक खात्याची माहीती व ओटीपी नंबर प्राप्त करुन ग्राहकांच्या बॅक खात्यातुन रक्कम काढुन फसणुक केली जाते.

तरी मुंबई पोलीसांकडून नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांचे कर्ज खात्याशी संबंधित ईएमआय पुढे ढकलण्यासाठी बॅकेकडून एसएमएस प्राप्त झाल्यास किंवा बॅकेचा अधिकारी/कर्मचारी बोलत असल्याचे भासवून ईएमआय पुढे ढकलण्यासाठीची सुविधा देत असल्याचे सांगून बॅक खात्याशी संबंधित गोपनीय माहिती जसे की, पिन, सीव्हीव्ही, ओटीपी इ. माहिती मागितल्यास तुम्ही सदरची गोपनीय माहिती कोणालाही देवु नये. तसेच समोरील व्यक्तीच्या सांगण्यावरुन कोणतेही ॲप्लीकेशन स्वत:च्या मोबाईलमध्ये डाउनलोड करुन नये.